where Passion meets Performance

www.pclindia.in
info@pclindia.in
+91 217 2357645
+91 9168646531/32/33
CIN L24231PN1992PLC067126

**PCL/SEC/23-24/016** **30th May 2024**

| To, | To, |
|---|---|
| **National Stock Exchange of India Limited,**<br>"Exchange Plaza" 5th Floor, Plot No. C-1,<br>G Block, Bandra Kurla Complex,<br>Bandra (East), Mumbai – 400051<br><br>**NSE Scrip Code - PRECAM** | **BSE Limited,**<br>Phiroze Jeejeebhoy Towers,<br>Dalal Street,<br>Mumbai - 400001<br><br>**BSE Scrip Code – 539636** |

**Subject: Newspaper Advertorial – Precision-EMOSS performance in Electric Vehicle Area**

Dear Sir/Madam,

Pursuant to Regulation 30 of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, we wish to inform you that Precision Camshafts Limited (the Company) is going to publish a press release/ newspaper advertorial titled as "इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रात प्रेसिजन-इमॉसची कामगिरी" (Precision-EMOSS performance in Electric Vehicle Area) in Divya Marathi Newspaper (a Marathi Newspaper - Solapur edition) on Friday, 31st May 2024 regarding performance of Precision-EMOSS in Electric Vehicle Business and updates in the progress achieved by Precision-EMOSS in that segment.

You are requested to take the same on record.

Thanking you,

For **Precision Camshafts Limited**

Tanmay Pethkar Digitally signed by Tanmay Pethkar Date: 2024.05.30 17:30:17 +05'30'

**Tanmay M. Pethkar**
Company Secretary and Compliance Officer
Membership No. A53618

where Passion meets Performance

FUTURE INSIDE

# इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रात प्रिसिजन – इमॉसची कामगिरी

प्रिसिजन कॅमशाफ्टस् लिमिटेड आणि इमॉस इंडियाने इलेक्ट्रिक मोबिलिटी व्यवसायाच्या क्षेत्रात सन २०२३ या एकाच वर्षात लक्षणीय कामगिरी केली. इलेक्ट्रिक मोबिलिटीमधील संशोधन, उत्पादन सुविधा निर्माण करणे, ग्राहक आधार वाढवणे, वितरण व्यवस्था निर्माण करणे अशा सर्वच विभागात भविष्यवेधी कामगिरी पार पडली आहे. इमॉस इंडियाने इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील एक सर्वोत्तम टीम उभी केली आहे.









"ई–एलसीव्ही च्या उत्पादनासाठी सोलापुरात अत्याधुनिक उत्पादन कारखाना सुरू करून २०२३ या वर्षाची सुरुवात झाली. या प्लान्टमुळे ई–मोबिलिटी क्षेत्रातील नाविन्य, संशोधन आणि उत्कृष्टता साध्य करण्याच्या दिशेने प्रिसिजनने मोठी झेप घेतली आहे. हलक्या व्यापारी वाहनांचे (ई–एलसीव्ही) विद्युतीकरण करणे याच उद्देशाने या प्लांटची उभारणी करण्यात आली. एका शिफ्टमध्ये, एका स्टेशनवर संपूर्ण एलसीव्ही गाडीचे इलेक्ट्रिफिकेशन करण्याची क्षमता या प्लांटमध्ये आहे.

वाढत्या गरजेनुसार नजिकच्या भविष्यात चिंचोळी औद्योगिक वसाहतीतील नव्या कारखान्यात या ई–एलसीव्ही उत्पादनाचं विस्तारीकरण केलं जाणार आहे. प्रिसिजन आणि इमॉसच्या टीमने एकाच वर्षात लक्षणीय कामगिरी केली आहे. या यशामध्ये टीमचे कौशल्य, तंत्रसिद्धता आणि समर्पण वृत्ती याचा मोठा वाटा आहे. कंपनीच्या सर्वच विभागातील कामात नवीन दृष्टीकोन, कौशल्ये आणि अनुभव देणाऱ्या वेगवेगळ्या पार्श्वभूमीतील सदस्यांचे टीममध्ये स्वागत करण्यासाठी आम्ही नेहमीच उत्सुक असतो . ई–मोबिलिटी क्षेत्राच्या भविष्याला आकार देण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. इमॉस इंडियाची इंजिनिअरिंग टीम आता बाणेर, पुणे येथील कार्यालयात आणि उत्पादनाची टीम सोलापुरातील प्लांटमध्ये कार्यरत आहे.

आपल्या मर्यादांच्या पलिकडे जात काम करणे हाच आमच्या प्रवासाचा आत्मा आहे, मागच्या वर्षी 'टाटा एस आणि अशोक लेलँडची दोस्त' या दोन गाड्यांचे इलेक्ट्रिक वाहनांमध्ये रूपांतर प्रिसिजनने केले. त्यासाठी टीमने अथक मेहनत घेतली. यातून अत्याधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे आणि वाहतुकीसाठी शाश्वत पर्याय देणे याबाबत असलेली आमची बांधिलकी दिसून येते. हे करत असताना भारतातील परिस्थिती आणि इथली आर्थिक स्थिती याबद्दलही आम्ही सजग होतो. गाडीची एका चार्जिंगमधील रेंज आणि बॅटरी पॅकबाबत आम्ही उत्तम पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. या इलेक्ट्रिक गाडीच्या पेलोडमध्ये – वजन वाहून नेण्याच्या क्षमतेमध्ये – कुठेही तडजोड न करता एका चार्जिंगमध्ये १०० किलो मिटर्सची शहरांतर्गत वाहतुक करू शकणारी वाहने आम्ही ग्राहकांकडे सुपूर्द केली आहेत.

**"नेदरलॅण्ड इकॉनॉमिक मिशन २०२३ च्या निमित्ताने जी–२० परिषदेमध्ये इमॉस कंपनीचा थेट सहभाग होता. ही आमच्यासाठी फार मोठी सुवर्णसंधी होती. नेदरलॅण्ड इकॉनॉमिक मिशन २०२३ मध्ये आम्हाला प्रिसिजन आणि इमॉसचं प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली. जी–२० शिखर परिषदेच्या दरम्यान बेंगलुरु, पुणे आणि मुंबई इथे ही परिषद झाली. नाविन्यता, शाश्वत वाहतुक पर्याय आणि जागतिक भागीदारी याविषयीची आमची बांधिलकी आम्ही या परिषदेत व्यक्त केली. या जी–२० शिखर परिषदेत प्रिसिजनचे कार्यकारी संचालक करण शहा उपस्थित होते."**




इलेक्ट्रिक वाहनांच्या बाजारपेठेत व्यावसायिक वाहन आणि विशिष्ट सेवा क्षेत्रामध्ये प्रचंड वाढीची क्षमता आहे. इमॉस ही कंपनी इलेक्ट्रिक वाहन विभागातील विकासात आघाडीवर राहण्यासाठी सदैव कार्यरत आहे.

आमच्या कंपनीने नेदरलँड मध्ये एकूण ६०० हून अधिक वाहने रेट्रोफीट केली आहेत.भारतातील आमची EV टीम आता हे तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळीचे स्थानिकीकरण करत आहे.

प्रिसिजनची मजबूत आर्थिक भागीदारी आणि ३० वर्षांहून अधिक काळ ऑपरेशन्स आणि मॅन्युफॅक्चरिंगचा अनुभव याचा फायदा इमॉस इंडियाला नक्की होणार आहे. भविष्यातील होणाऱ्या इलेक्ट्रिक वाहनांच्या क्रांतीसाठी आम्ही आता सज्ज आहोत.



**करण शहा**
**कार्यकारी संचालक**
**प्रिसिजन कॅमशाफ्ट लिमिटेड**

नोव्हेंबर आणि डिसेंबर २०२३ मध्ये आम्ही रिपॉवर केलेल्या ई–एलसीव्ही काही महत्वपूर्ण ग्राहकांना वितरित केल्या. या गाड्यांच्या माध्यमातून आमच्या संशोधनाचा एक सकारात्मक परिणाम ग्राहकांच्या व्यवसायावर आणि पर्यावरणावर होताना दिसतो आहे.

देशभरातल्या विविध क्षेत्रातील हे ग्राहक आहेत. गाडीबद्दलची विश्वासार्हता, तत्परता आणि परफॉर्मन्स याबाबत ग्राहकांचा आत्मविश्वास वाढण्यासाठी हे महत्वपूर्ण पाऊल होते.

पर्यावरणपूरक वाहतूक, कार्बन वायुचे उत्सर्जन कमी करणे आणि हरित भविष्याकडे वाटचाल करणे या बाबी या भागीदारांमधला समान धागा आहे.आम्हाला सांगायला अभिमान वाटतो की, आम्ही आमच्या पहिल्याच इलेक्ट्रिक वाहनामध्ये ९० टक्के सुटे भाग हे भारतीय बनावटीचे आहेत.

सगळ्या ई–एलसीव्ही गाड्यांची जोडणी भारतातच आणि भारतीय ग्राहकांसाठीच करण्यात येते. या नव्या प्रवासात आमचे पुरवठादार, ग्राहक आणि संपूर्ण टीमची खूप मोठी साथ लाभली. या सर्वांचे पाठबळ व कंपनीचे चेअरमन यतिन शहा तसेच संचालक व सीएफओ रवींद्र जोशी यांचे मार्गदर्शन हे वेगळं काही करण्याच्या आमच्या ध्येयासाठी मोठी ऊर्जा देते. सर्वात महत्वाचे इमॉसवर विश्वास दर्शवून इलेक्ट्रिक वाहनांच्या भविष्यातील वाटचालीत भागीदार झाल्याबद्दल आमच्या सर्व ग्राहकांचे मनापासून आभार.



**सोलापूर महानगर पालिकेच्या आयुक्त मा. शीतल तेली उगले यांना ई–एलसीव्हीची चावी प्रदान करताना मा. करण शहा व मा. यतिन शहा**



**पुणे महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांना ई–एलसीव्हीची चावी प्रदान करताना करण शहा. यावेळी अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार व अन्य अधिकारी.**



**सोप्पा या ट्रान्सपोर्टेशन,सप्लाय चेन व स्टोअरेज क्षेत्रातील कंपनीच्या अधिकाऱ्यांना चावी प्रदान करताना मा. करण शहा.**




**ब्ल्यू व्हील्स या लॉजिस्टीक कंपनीच्या अधिकाऱ्यांना चावीप्रदान करताना इमॉस इंडिया टीमचे अधिकारी.**





**भारत विकास ग्रुप (BVG) या कचरा व्यवस्थापन क्षेत्रातील सर्वात मोठ्या ग्रुपला ई–एलसीव्हीची चावी प्रदान करताना मा. करण शहा.**

**पर्यावरण संरक्षण, कचरा व्यवस्थापन क्षेत्रात कार्य करणाऱ्या अदर पुनावाला क्लिन सिटी इनिशिएटीव्ह कंपनीला ई–एलसीव्ही प्रदान केली.**




